# दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर ता. गंगाखेड जि. परभणी यांचे न्यायालयात

(पीठासीन अधिकारी: श्री गजानन भा. यादव)

मुरलीधर महाजन पुपलवाड
विरूध्द
बालाजी भिमराव पुपलवाड

नियमित दिवाणी दावा क्रमांक: २१५/२०२३

**निशाणी क्रमांक ५ वरील आदेश**
(अधिघोषीत केल्याचा दिनांक १४ ऑक्टोबर २०२५)

१. अर्जाचे अवलोकन करण्यात आले तसेच त्यावर प्रतिवादी तर्फे दाखल म्हणणे यांचे देखील अवलोकन करण्यात आले. वादीतर्फे ॲड. श्री एस.बी.पवार व प्रतिवादी तर्फे ॲड. सी.बी.मांदोडे यांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. वादीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की,वाद मिळकत ही दशरथ चिमाजी पपुलवाड यांना कबाला म्हणून मिळालेली आहे. दशरथ यास तिन मुले नामे महाजन, भिमराव व भाउराव होते. महाजना यास चार मुले नामे गंगाधर, मुरलीधर, राजू व दशरथ असे होते. भिमराव यास बालाजी व विजयमाला असे अपत्य आहेत. त्याच प्रमाणे भाउराव यास राजेश व वर्षा असे अपत्य आहेत. वादी शिवाय सर्व व्यक्ती हे बाहेरगावी कामासाठी राहत आहे वादी हाच एकमेव वादमिळकतीवर वास्तव्यास आहे. वादीने सर्वांना प्रत्येकी दहा हजार रूपये प्रमाणे मोबदला दिला व मिळकत ही वादीच्या नावे करावयाची ठरली. मात्र वादीच्या वडीलांच्या मृत्यूपश्चात सर्वाचे मन बदलले व त्यांनी वादीच्या नावे मिळकत करण्यात नकार दिला. राजेश व वर्षा हे वादीच्या नावावर मिळकत करण्यास तयार असल्यामुळे त्यांना या प्रकरणात पक्षकार करण्यात आलेले नाही. प्रतिवादी हे त्याचे नाव अभिलेखावर असल्याचा गैरफायदा घेत त्यावर त्रयस्थ इसमांचे हक्क व अधिकार निर्माण करण्याच्या तयारीत

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2025.10.14 15:38:16 +0530

आहे तसे झाल्यास वादीस अपरिमित असे नुकसान होईल. वादीने प्रथमदर्शनी केस शाबित केली आहे, न्यायाचा समतोल वादीच्याच बाजुने आहे करिता वादीचा अर्ज मागणीप्रमाणे मंजुर करण्याची विनंती करण्यात आली आहे.

२. प्रतिवादीतर्फे अर्जास प्रखर विरोध नोंदविण्यात आला व असा युक्तिवाद करण्यात आला की वादीनेच दाखल केलेल्या दस्तांनुसार वादीचे वडील व चुलते यांच्या वाटत झाले आहे व वाटणीपत्राचे स्मरणपत्र देखीला १९७८ साली लिहून ठेवण्यात आले आहे. त्याप्रमाणे वादमिळकती मध्ये वादीचा फक्त १/३ हिस्सा असतांना त्यांने संपुर्ण मिळकतीचा दावा दाखल केला आहे. वादीचे चुलते भाउराव यांनी त्याचा हिस्सा प्रतिवादी क्रमंक १ व २ ची आई नागराबाई हिला नोंदणीकृत खरेदीखताआधारे विक्री केला आहे. त्यामुळे प्रतिवादींचा २/३ इतका हिस्सा वादमिळकतीत आहे परिणामत: वादीस संपुर्ण मिळकतीसाठी दावा दाखल करण्याचा अधिकारी नाही. वादीस कोणताही अपरिमित नुकसान संभवत नाही करिता वादीचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. उभयपक्षांचा युक्तिवाद व अभिलेखावरिल कागदपत्रे यांचे अवलोकनाअंती पुढील मुद्दे माझ्यासमक्ष उपस्थित झाले आहे. त्यावर मी खाली दिलेल्या कारणमिमांसे आधारे निष्कर्ष नोंदवित आहे.

| अनु. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीने प्रथमदर्शनी केस शाबित केली आहे का? | नकारार्थी |
| २ | न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने आहे का? | नकारार्थी |
| ३ | मनाई हूकुमनाकारल्यास अपरिमित नुकसान संभवतो का? | नकारार्थी |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2025.10.14 15:38:27 +0530

४ आदेश काय? आदेशाप्रमाणे

**कारणमिमांसा**

४. वादी व प्रतिवादी यांच्या तर्फे अभिलेखावर जे कागदपत्रे सादर करण्यात आली आहे त्यावरून असे दिसून येत आहे की वादीचे आजोबा दशरथ चिमाजी पपुलवाड यांस वादमिळकती कबाला म्हणून मिळालेली आहे. दशरथ च्य मृत्यूपश्चात महाजन, भिमराव व भाउराव यांच्या १९७८ साली वाटणीचे स्मरणपत्र लिहण्यात आले. त्यानुसार वादीचे वडील महाजन यास पुर्ण जागेपैकी पश्चिमेकडील भाग पुर्वपश्चिम १४ फुटव पुढे एक वड १७ फुट तसेच दक्षिणोत्तर ३० फुट क्षेत्र वाटपास आले. भिमराव यास पुर्व पश्चिम १६ १/२ फुट व दक्षिणोत्तर १६ फुट जागा वाटपास आली व भाउराव यास पुर्वपश्चिम १७ १/२ फुट व दक्षिणोत्तर २२ फुट क्षेत्र वाटपात देण्यात आले.

५. वादीनेच दाखल केलेल्या नगरपरिषद गंगाखेडच्या कर आकारणी रजिस्टर च्या उता—यावररून असे दिसनू येत आहे की वादीच्या नावे मालमत्ता क्रमांक १२८/३—४ असून त्याचे क्षेत्र पुर्व पश्चिम दक्षिण बाजू १४ फूट, पूर्वपश्चिम उत्तर बाजू १८ फुट, दक्षिणोत्तर पुर्व बाजू ११ फुट व दक्षिणोत्तर पश्चिम बाजू २९ फुट असे आहे. संपुर्ण मालमत्तेचे क्षेत्र २२ हात **X** ३६ हात एवढे आहे. अशा परिस्थितीत वादीच्यो नावे संपुर्ण मालमत्ता नसल्याचे दिसून येत आहे. वादीने जे कथन केले आहे की त्याने सर्वाना प्रत्येकी १०,०००/ प्रमाणे रक्कम अदा केलेली आहे मात्र त्याबदद्ल कोणताही प्रथमदर्शनी पुरावा शाबित केला नाही. तसेच ती रक्कम कोणत्या वर्षी दिली या बदद्ल देखील कोणतेही कथन करण्यात आलेले नाही.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2025.10.14 15:38:46 +0530

६.	वर नमुद कथनांच्या पार्श्वभुमीत वादीने संपुर्ण वादमिळकतीवरील त्याचे हक्क व अधिकार शाबित केलेले नाही त्यामुळे वादीने प्रथमदर्शनी केस शाबित केलेले नाही, न्यायाचा समतोल देखील वादीच्या बाजुने नाही. परिणामत: वादीस अपरिमित नुकसान संभवण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. करिता मी मुदद्‍ा क्रमांक १ ते ३ वर निष्कर्ष नकारार्थी नोंदवून पुढील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१	अर्ज नि.क्र ५ नामंजुर करण्यात येत आहे.

२	अर्जाचा खर्च अर्जदारावर.

Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2025.10.14 15:38:58 +0530

दिनांक: १४ ऑक्टोबर २०२५	(गजानन भा. यादव)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, गंगाखेड